(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

[२०२२] ५ एस. सी. आर. ८६३

उत्तम

वि.

महाराष्ट्र राज्य

(फौजदारी अपील क्र. ४८५/२०१२)

२ जून, २०२२

**[बी. आर. गवई आणि हिमा कोहली, न्या. न्या. ]**

पुरावा अधिनियम, १८७२ – अनेक मृत्यूकालीन कथने – अनुज्ञेयता, पुराव्यात्मक मूल्य - दंड विधान, १८६० - कलम ३०२ - स. सा. - ९ (विशेष कार्यकारी दंडाधिकारी) आणि स. सा. - १४ (तपासी अधिकारी) यांनी लेखी स्वरूपात नोंदवलेल्या मृत व्यक्तीच्या दोन मृत्यूकालीन कथनांवर आणि मृत व्यक्तीने स. सा. - २ (तिचे वडील) आणि स. सा. - १२ (पक्षकारांचा विवाह आयोजित करणारा मध्यस्थ) यांना दिलेल्या दोन तोंडी मृत्यूकालीन कथनांवर अवलंबून राहून, पत्नीवर रॉकेल ओतून तिला पेटवून दिल्याबद्दल अपीलकर्त्याला कलम ३०२ अन्वये दोषी ठरविण्यात आले - उच्च न्यायालयाने लेखी मृत्यूकालीन कथने फेटाळून लावली, पण स. सा. - २ आणि स.

सा. - १२ यांच्या साक्षीवर विश्वास ठेवून अपीलकर्त्याने दाखल केलेले अपील फेटाळून लावले - अपीलात असा निर्णय देण्यात आला की : ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाला असे आढळते की, एकापेक्षा जास्त मृत्यूकालीन कथने अस्तित्वात आहेत, अशा प्रकरणांमध्ये प्रत्येकाची काळजीपूर्वक आणि सावधगिरीने तपासणी केली पाहिजे आणि मृत्यूकालीन कथनांपैकी कोणते कथन संशयास्पद परिस्थितीपासून मुक्त असल्याचे आणि ते स्वेच्छेने केले गेले असल्याचे दिसते याबाबत स्वतःची खात्री केल्यानंतरच, ते स्वीकारण्यात यावे - परंतु, मृत्यूकालीन कथनात काही त्रुटी असल्यास, आरोपीला दोषी ठरविण्याचा तो एकमेव आधार असू शकत नाही - प्रस्तुत प्रकरणात, एकदा का उच्च न्यायालयाने मृत्यूकालीन कथन नोंदवताना एसईएम (स. सा. - ९) आणि तपासी अधिकारी (स. सा. - १४) यांनी अवलंबलेल्या प्रक्रियेतील अनेक स्पष्ट त्रुटींमुळे मृत व्यक्तीची दोन लेखी मृत्यूकालीन कथने फेटाळून लावली, त्यानंतर स. सा. - २, मृत व्यक्तीचे वडील आणि स. सा. १२, कुटुंबाचे मित्र, जे दोघेही हितसंबंधी साक्षीदार होते आणि ज्यांचे पुरावे स. सा. - ९ आणि स. सा. - १४ द्वारे नोंदवलेल्या मृत व्यक्तीच्या कथनाच्या आवृत्तीच्या विरुद्ध आहेत, त्यांच्या तोंडी साक्षीवर अपीलकर्त्यावर आरोप ठेवता आले नसते - स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षींना आधार देण्यासाठी विश्वासार्ह परिपोषक साक्षीपुरावा सादर करण्याची जबाबदारी पार पाडण्यात अभियोग पक्षास अपयश आले - आक्षेपित न्यायनिर्णय रद्दबातल ठरविण्यात आला - अपीलकर्त्याला संशयाचा फायदा देण्यात आला, दोषमुक्त करण्यात आले.

पुरावा अधिनियम, १८७२ - कलम ३२, ६० - मृत्यूकालीन कथन – कलम ३२, कलम ६० मधील सर्वसाधारण नियमाला अपवाद – असा निर्णय देण्यात आला की : कलम ३२ हे कलम ६० मधील सर्वसाधारण नियमाला अपवाद आहे की 'ऐकीव पुरावा ग्राह्य नसतो' आणि जेव्हा असा पुरावा प्रत्यक्ष असतो आणि उलटतपासणीद्वारे त्याची पडताळणी केली जाते, तेव्हाच तो विश्वासार्ह मानला जातो.

पुरावा अधिनियम, १८७२ - दंडाधिकाऱ्यांनी नोंदवलेले मृत्यूकालीन कथन - विश्वासार्हता - चर्चा करण्यात आली.

अपील मंजूर करताना न्यायालयाने असा निर्णय दिला की :

१.१ मृत्युकालीन कथन हे एखादया व्यक्तीने, जेव्हा घोषित करणाऱ्यास त्याच्या जिवंत राहण्याची जवळजवळ शून्य शक्यता आहे याची जाणीव असते, त्या टप्प्यावर, त्याच्या जवळ येऊन ठेपलेल्या मृत्यूच्या कारणाबाबत किंवा ज्या परिस्थितीत तसा प्रसंग उद्भवला, त्याबाबत केलेले शेवटचे विधान असते. अशा नाजूक अवस्थेत एखादी व्यक्ती खरे सांगणे अपेक्षित आहे, या गृहितकावर न्यायालयाने अशा विधानाच्या सत्यतेला खूप महत्त्व दिले आहे. भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलम ३२ मध्ये असे नमूद केले आहे की, ज्या कामात एखादया व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला असेल त्या कामात, जेव्हा त्या व्यक्तीने आपल्या मृत्यूच्या कारणासंबंधी किंवा ज्या घडामोडीचे पर्यवसान तिच्या मृत्युत झाले त्यातील कोणत्याही परिस्थितीविशेषासंबंधी कथन केले असेल तेव्हा मयत बळी व्यक्तीने साक्षीदारास

केलेले तोंडी अथवा लेखी, असे कथन संबद्ध कथन असते आणि पुराव्यात ग्राह्य असते. 'ऐकीव पुरावा अग्राह्य आहे' या पुरावा अधिनियमाच्या कलम ६० मधील सर्वसाधारण नियमाला सदर तरतूद अपवाद आहे आणि जेव्हा असा पुरावा प्रत्यक्ष असेल आणि उलटतपासणीद्वारे पडताळणी करण्यात आला असेल तरच तो विश्वासार्ह मानला जातो, हे लक्षात घेण्याजोगे आहे. ज्या प्रकरणांत मयत व्यक्तीने केलेल्या अनेक मृत्यूकालीन कथनांचा समावेश असतो, त्या प्रकरणी सदर मृत्यूकालीन कथनांपैकी कोणत्या कथनावर न्यायालयाने विश्वास ठेवायला हवा आणि न्याय्य व कायदेशीर निष्कर्षाप्रत येण्यासाठी कोणते मार्गदर्शक घटक असावेत हा प्रश्न विचारार्थ उपस्थित होतो. जेव्हा मृत व्यक्तीने केलेली मृत्यूकालीन कथने ही परस्परविरोधी असल्याचे आढळते तेव्हा ही समस्या अधिक कठीण होते. अशा परिस्थितीला सामोरे जाताना, सरकारी पक्षाने सादर केलेल्या इतर महत्वाच्या पुराव्यांद्वारे मृत्यूकालीन कथनांपैकी कोणत्या कथनाला दुजोरा देता येईल, हे शोधण्यासाठी न्यायालयाने पुराव्यांची बारकाईने छाननी करणे अपेक्षित आहे. संबंधित वेळी मृत व्यक्तीची स्थिती, मृत व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती दर्शविणारे अभिलेखावर सादर केलेले वैद्यकीय पुरावे, जवळच्या नातेवाईकांना / कुटुंबातील सदस्यांना मृत व्यक्तीला प्रभावित करण्याची /शिकवण देण्याची मोकळीक आणि न्यायालयाला आपल्या विवेकाचा वापर करण्यास मदत करणारी इतर सर्व आनुषंगिक परिस्थिती तितकीच महत्त्वाची आहे. अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाला असे आढळले आहे की, एकापेक्षा जास्त मृत्यूकालीन कथने अस्तित्वात

आहेत, त्या प्रकरणांत त्यातील प्रत्येकाची काळजीपूर्वक आणि सावधगिरीने तपासणी केली पाहिजे आणि मृत्यूकालीन कथनांपैकी कोणते कथन संशयास्पद परिस्थितीपासून मुक्त असल्याचे दिसते आणि स्वेच्छेने केले गेले आहे, याबाबत खात्री केल्यानंतरच ते स्वीकारण्यात यावे. प्रत्येक प्रकरणात, मृत्यूकालीन कथनाची पुष्टी ही प्रत्यक्ष किंवा अन्यथा संबंधित पुराव्यासह केली जाणे आवश्यक नाही. उपस्थित तथ्ये आणि परिस्थिती आणि अभिलेखावर सादर करण्यात आलेले इतर पुरावे यांवरून न्यायालये मृत्यूकालीन कथनाच्या वैधता प्राप्त करतात हा अधिक समंजसपणाचा नियम आहे. याच कारणास्तव, घोषित करणारी व्यक्ती कथन करण्यास योग्य असल्याचे डॉक्टरांनी दिलेले प्रमाणपत्र हे, मृत व्यक्तीने केलेल्या कथनाची सत्यता सिद्ध करण्यासाठी सावधगिरीचा नियम समजला जातो. परंतु, मृत्यूकालीन कथनात काही कमकुवतपणा असल्यास, आरोपींना दोषी ठरवण्यासाठी ते एकमेव आधार असू शकत नाही. अशा परिस्थितीत, न्यायालयाने एक पाऊल मागे घेऊन, प्रकरणातील एकत्रित घटकांमुळे त्या मृत्यूकालीन कथनावर विसंबून राहणे कठीण होते का? या बाबीचा विचार केला पाहिजे. दंडाधिकाऱ्यांनी नोंदवलेल्या मृत्यूकालीन कथनाची विश्वासार्हता देखील अनेक प्रकरणांमध्ये विचारार्थ आली आहे आणि असा निर्णय देण्यात आला आहे की, दंडाधिकारी हा हितसंबंध नसलेला साक्षीदार आणि एक आदरणीय अधिकारी असल्यामुळे आणि त्याला आरोपीविरुद्ध कोणत्याही प्रकारची द्वेषबुद्धी असेल किंवा मृत्यूकालीन कथनाचा बनाव करण्यात कोणत्याही प्रकारे त्याला रस असेल, असा संशय

घेण्यासाठी कोणताही परिस्थिति किंवा सामग्री नसल्यामुळे, दंडाधिकाऱ्याने नोंदवलेल्या अशा प्रकारच्या कथनावर शंका घेतली जाऊ नये. [परि. ११, १५, १९, २२ आणि २५]

[८७२-जी; ८७३ ए सी; ८७५ एफ – जी; ८७६-ए -सी; ८८० सी - डी; ८८२-डी -एफ ]

नल्लापती शिवय्या वि. उपविभागीय अधिकारी, गुंटूर, आंध्र प्रदेश **(२००७) १५ एससीसी ४६५ : [२००७] १० एससीआर ३४७ ;** अरविंद सिंग वि. बिहार राज्य **(२००१) ६ एससीसी ४०७ : [२००१] ३ एससीआर २१८;** कुंडुला बाला सुब्रमण्यम आणि अन्य एक वि. आंध्र प्रदेश राज्य, **(१९९३) २ एससीसी ६८४ : [१९९३] २ एससीआर ६६६;** शुधाकर वि. मध्य प्रदेश राज्य **(२०१२) ७ एससीसी ५६९ : [२०१२] ७ एससीआर १२८;** पाणीबेन (श्रीमती) वि. गुजरात राज्य **(१९९२) २ एससीसी ४७४ : [१९९२] २ एससीआर १९७;** लखन विरुद्ध मध्य प्रदेश राज्य **(२०१०) ८ एससीसी ५१४ : [२०१०] ९ एससीआर ७०५;** अमोल सिंग वि. मध्य प्रदेश राज्य **(२००८) ५ एससीसी ४६८ : [२००८] ८ एससीआर ९५६;** शेरसिंग आणि अन्य एक वि. पंजाब राज्य **(२००८) ४ एससीसी २६५ : [२००८] २ एससीआर ९५९ ;** उत्तर प्रदेश राज्य वि. वीरपाल आणि अन्य एक **(२०२२) ४ एससीसी ७४१ : २०२२ (२) जेटी ५०३;** खुशाल राव वि. मुंबई राज्य **(१९७४) ४ एससीसी २६४ - यावर भिस्त ठेवली.**

१.२ एसईएम **(स. सा. -** ९) आणि तपासी अधिकारी **(स. सा. -** १४ ) यांनी मृत्यूकालीन कथन नोंदवताना अवलंबिलेल्या प्रक्रियेतील अनेक त्रुटी लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने त्यांवर अवलंबून राहणे असुरक्षित ठरवले आणि ती बाजूला ठेवली. दोन

लेखी मृत्युकालीन कथने त्रुटींनी भरलेली असल्याने अविश्वसनीय ठरल्यामुळे ती फेटाळून लावण्यासाठी उच्च न्यायालयाने नोंदविलेल्या निष्कर्षांना कोणतेही आव्हान दिले नसल्यामुळे त्यांच्या विश्वसनीयतेबाबत चौकशी करीत नाही. ती अविश्वसनीय वाटण्यासाठी उच्च न्यायालयास ही सर्व कारणे होती असे म्हणणे पुरेसे आहे. त्याऐवजी, स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या उपस्थितीत मृत व्यक्तीने सांगितलेल्या तोंडी मृत्युकालीन कथनांचे मूल्य तपासणे योग्य वाटते. स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षीचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, त्यांनी मृत व्यक्तीने त्यांना कथितरीत्या सांगितलेल्या गोष्टींच्या वेगवेगळ्या आवृत्त्या सादर केल्या आहेत. अपीलकर्त्याच्या सततच्या हुंड्याच्या मागण्या पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याने ही घटना घडल्याचे या दोघांनी सांगितले. अपीलकर्त्याचे शेजारच्या एका विधवा महिलेशी अनैतिक संबंध होते, जे मृत व्यक्ती आणि अपीलकर्ता यांच्यातील भांडणाचे सतत कारण होते आणि त्यामुळे हा प्रसंग उद्भवला असल्याचा काहीही उल्लेख नव्हता. तपासादरम्यान पोलिसांनी आपला जबाब नोंदवला नव्हता आणि खटल्यादरम्यान साक्षीदाराच्या पिंजऱ्यात प्रवेश केल्यानंतरच त्यांनी प्रथमच साक्ष दिली होती असे दोन्ही साक्षीदारांनी सांगितले, ही बाब समर्पक आहे. एकदा का उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाच्या मताशी असहमती दर्शविली आणि मृत्यूकालीन कथन नोंदवताना एसईएम (स. सा. - ९) आणि तपासी अधिकारी (स. सा. - १४) यांनी अवलंबलेल्या प्रक्रियेतील अनेक स्पष्ट त्रुटींमुळे मृत व्यक्तीची दोन लेखी मृत्यूकालीन

कथने फेटाळून लावली, त्यानंतर स. सा. - २, मृत व्यक्तीचे वडील आणि स. सा. १२, कुटुंबाचे मित्र, जे दोघेही हितसंबंधी साक्षीदार होते आणि ज्यांचे पुरावे स. सा. - ९ आणि स. सा. - १४ द्वारे नोंदवलेल्या मृत व्यक्तीच्या कथनाच्या आवृत्तीच्या विरुद्ध आहेत, त्यांच्या तोंडी साक्षीवर अपीलकर्त्यावर आरोप ठेवता आले नसते. हे लक्षात घेतले पाहिजे की, दोन ले**खी आणि इतर दोन तोंडी अशी चारही मृत्यूकालीन कथने ही, जेव्हा मृत महिलेला ९३% भाजल्याच्या जखमा झाल्या होत्या आणि कथन करण्यासाठी ती मानसिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहे की नाही याबद्दल गंभीर शंका होती, तेव्हा तिने दिनांक २७ मार्च, १९९५ या एकाच दिवशी वेगवेगळ्या वेळी दिलेल्या जबाबांवर आधारित होती.** तपासी अधिकाऱ्याने (स. सा. - १४) दुपारी ३.२० वाजता पहिले मृत्यूकालीन कथन नोंदविले होते, त्यानंतर एसईएम (स. सा. - ९) ने दुपारी ४.३० ते ५.०० च्या दरम्यान दुसरे मृत्यूकालीन कथन नोंदविले होते. त्याच दिवशी स. सा. २ आणि स. सा. - १२ यांनीदेखील रुग्णालयात मृत महिलेची भेट घेतली होती आणि असा दावा केला होता की, तिला भाजल्याच्या जखमा कशा झाल्या होत्या याची माहिती तिने त्यांना दिली होती आणि अपीलकर्त्याचे नाव आरोपी म्हणून घेतले होते. स. सा. २ आणि स. सा. -१२ या दोघांनीही अशी साक्ष दिली आहे की, मृत व्यक्तीकडे अपीलकर्त्याने केलेल्या हुंड्याच्या मागण्या आणि त्याने तिच्या चारित्र्यावर संशय घेतल्यामुळे कथित घटना घडली होती, या बाबींचा मृत व्यक्तीने आपल्या मृत्यूकालीन कथनात उल्लेख केला होता. त्यांच्या साक्षीत कोठेही अभियोग पक्षाच्या

म्हणण्याचा उल्लेख केलेला नाही की, अपीलकर्त्याचे शेजारी राहणाऱ्या एका विधवा महिलेशी अनैतिक संबंध होते, जे दांपत्यामधील कटुतेचे मुख्य कारण होते आणि ज्याच्या परिणामी ही घटना घडली होती. या कथित घटनेला कारणीभूत ठरणाऱ्या कारणांची पूर्णपणे वेगळी आवृत्ती स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या संपूर्ण साक्षीवर छाया टाकते, ज्यामुळे त्यावर अवलंबून राहणे आणि अपीलकर्त्यावर ठेवलेल्या आरोपासाठी त्याला दोषी ठरविणे असुरक्षित होते. स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षींना आधार देण्यासाठी विश्वासार्ह परिपोषक साक्षीपुरावा सादर करण्याची जबाबदारी पार पाडण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे. उच्च न्यायालयाने काढलेल्या निष्कर्षांना संमती देणे अवघड आहे. अपीलकर्त्याला त्याच्या पत्नीच्या हत्येच्या गुन्ह्यामध्ये दोषी ठरवण्यासाठी स. सा. - २ आणि स.सा. १२ यांचे पुरावे पुरेसे भक्कम मानले जाऊ शकत नाहीत. म्हणून तो संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहे. अपीलकर्त्यास दोषमुक्त करण्यात येत आहे. [परि. २७, ३१, ३४, ३६-३९] [८८३ - बी; ८८४ – ई - जी; ८८६ - ए - सी; ८८८ - ए -सी]

अरुण भांडूदास पवार वि. महाराष्ट्र राज्य, **(२००८) ११ एससीसी २३२ : २००८ (१) जेटी ३४८;** पूनम बाई वि. छत्तीसगढ राज्य **(२०१९) ६ एससीसी १४५ : २०१९ (५) जेटी ४०३** – यांवर भिस्त ठेवली.

रिझान आणि अन्य एक वि. छत्तीसगढ राज्य **(२००३) २ एससीसी ६६१ : [२००३] १ एससीआर ४५७;** भगवान तुकाराम डांगे वि. महाराष्ट्र राज्य

**(२०१४) ४ एससीसी २७० : [२०१४] ३ एससीआर ७५३;** त्रिमुख मारोती किरकण वि. महाराष्ट्र राज्य **(२००६) १० एससीसी ६८१ : [२००६] ७ पुरवणी एससीआर १५६ - संदर्भित.**

**<u>निर्णयविधि संदर्भ</u>**

| | | |
|---|---|---|
| **[२००७] १० एससीआर ३४७** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद ७** |
| **[२००१] ३ एससीआर २१८** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद ७** |
| **[२००३] १ एससीआर ४५७** | **संदर्भित** | **परिच्छेद ९** |
| **[२०१४] ३ एससीआर ७५३** | **संदर्भित** | **परिच्छेद ९** |
| **[२००६] ७ पुरवणी एससीआर १५६** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद ९** |
| **[१९९३] २ एससीआर ६६६** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद १२** |
| **[२०१२] ७ एससीआर १२८** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद १३** |
| **[१९९२] २ एससीआर १९७** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद १४** |
| **[२०१०] ९ एससीआर ७०५** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद १६** |
| **[२००८] ८ एससीआर ९५६** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद १७** |
| **[२००८] २ एससीआर ९५९** | **अवलंबून राहिले** | **परिच्छेद १८** |

फौजदारी अपीलिय अधिकारिता : फौजदारी अपील क्र. ४८५/२०१२.

फौजदारी अपील क्र. १४९/१९९७ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ, नागपूर यांच्या दिनांक २६.०७.२०१० रोजीच्या न्यायनिर्णय व आदेशापासून.

रोहन थनवानी, प्रतुल प्रताप सिंग, श्रीमती वंदना सहगल, अपीलकर्त्याकरिता

अधिवक्ते.

सचिन पाटील, राहुल चिटणीस, आदित्य ए. पांडे, जिओ जोसेफ, श्रीमती श्वेताल शेपाळ, उत्तरवादींकरिता अधिवक्ते.

न्यायालयाचा न्यायनिर्णय आणि आदेश **हिमा कोहली, न्या.** यांनी दिला.

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर येथील खंडपीठातील खंडपीठाने दिनांक २६ जुलै, २०१० रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णयाविरुद्ध प्रस्तुत अपील करण्यात आले आहे. ८ वे अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नागपूर यांनी, अपीलकर्त्याला भारतीय दंड विधान, १८६०[1] च्या कलम ३०२ अन्वये गुन्ह्यासाठी दोषी ठरवून त्याला जन्मठेपेची शिक्षा व रु. १०००/- (रुपये एक हजार) इतकी दंडाची शिक्षा आणि त्यात कसूर केल्यास तीन महिन्यांच्या कालावधीसाठी साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्याबाबत दिनांक २९ एप्रिल, १९९७ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेश यांविरुद्ध अपीलकर्त्याने केलेले अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावले आहे.

२. अभियोग पक्षाचे प्रकरण असे आहे की, मयत पुष्पाबाई आणि अपीलकर्त्याचा विवाह दिनांक १९ मार्च १९९४ रोजी झाला होता. लग्नापासून त्यांना काहीही मूलबाळ नव्हते. अपीलकर्ता हा टी.व्ही. मेकॅनिक होता. अपीलकर्त्याच्या घराशेजारी राहणाऱ्या कुसुम गायकवाड नावाच्या विधवा महिलेशी अपीलकर्त्याचे अनैतिक संबंध असल्याचा आरोप करण्यात आला होता. दिनांक २६ मार्च, १९९५ रोजी

1 संक्षिप्ततेसाठी 'भा. दं. वि.'

अपीलकर्ता व कुसुम गायकवाड चित्रपट पाहण्यासाठी गेले होते. सायंकाळी जेव्हा तो घरी परतला, तेव्हा कुसुम गायकवाड यांच्यासोबत चित्रपट पाहण्यासाठी गेल्याबद्दल त्याच्या पत्नीने त्यांना जाब विचारला. अपीलकर्त्याचे पुष्पाबाईंसोबत भांडण झाले आणि त्याने कुसुम गायकवाड ही आपली प्रेयसी असल्याचे सांगितले. त्याने पुष्पाबाईला मारहाणही केली होती. दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच दिनांक २७ मार्च, १९९५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारच्या दरम्यान, अपीलकर्त्याने पुष्पाबाईंशी पुन्हा भांडण केले आणि तो कुसुम गायकवाड हिला सोडणार नाही असे त्याने तिला सांगितले. त्यावर पुष्पाबाईने घटस्फोटाची मागणी केल्याने याचिकाकर्ता संतापला आणि तिला मारहाण केली. त्यानंतर त्याने आपल्या पत्नीवर रॉकेल ओतले आणि माचिसची काडी पेटवून तिला पेटवून दिले. यावेळी अपीलकर्त्याच्या भावाने तिच्यावर पाणी ओतून आग विझवण्यासाठी धाव घेतली. पुष्पाबाई यांच्या चेहऱ्यावर, स्तनावर, पोटावर, दोन्ही हातांना आणि पायांना गंभीर भाजल्याच्या जखमा झाल्या. त्यांना उपचारासाठी नागपूरच्या मेयो रुग्णालयात नेण्यात आले असता, तिला झालेल्या जखमांमुळे दिनांक ३१ मार्च, १९९५ रोजी तिचा मृत्यू झाला.

३. मेयो पोलिस ठाणे, नागपूर यांनी वरील घटनेची माहिती तपासी अधिकारी[2] उपनिरीक्षक मधुकर गिते (स. सा. - १४) यांना दिली. पुष्पाबाई जेथे नाश्ता बनवीत होत्या तेथील स्टोव्हवर त्यांच्या साडीचा पदर पडल्यामुळे पेट घेतल्याची माहिती तपासी

2 संक्षिप्ततेसाठी 'त. अ.'

अधिकाऱ्यास देण्यात आली होती. वरील माहिती मिळताच तपासी अधिकाऱ्याने स्टेशन डायरीत नोंद करून दवाखान्यात धाव घेतली आणि त्यांनी दुपारी ३.२० वाजता दोन पंचांच्या उपस्थितीत पुष्पाबाईंचा जबाब नोंदवला (नि. ४७). मयताचे हे पहिले मृत्युकालीन कथन होते. एका तासानंतर विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी[3] (स. सा. - ९) दुपारी ४.३० ते ५.०० च्या दरम्यान पुष्पाबाईंचा जबाब नोंदवला (नि. ३८). हे दुसरे मृत्युकालीन कथन होते.

४. दिनांक ३ फेब्रुवारी, १९९७ रोजीच्या आदेशानुसार न्यायचौकशी न्यायालयाने अपीलकर्त्याविरुद्ध भादंवि च्या कलम ३०२ अन्वये आरोप निश्चित केले. अपीलकर्त्याने दोषी असल्याचे नाकारल्याने खटला चालविण्यात आला. सरकारी पक्षाने मृताचे वडील रामकृष्ण महादेव उचले (स. सा. - २) यांच्यासह १५ साक्षीदार तपासले ; राजू लारोकर;, एसईएम (स. सा. - ९ ); समीर विजय चौधरी, कनिष्ठ निवासी डॉक्टर (स. सा - १०); डॉ. नरेश चंद्र सेठिया, वैद्यकीय अधिकारी (स. सा -११); बालाजी मोहोड (स. सा. - १२), पक्षकारांच्या लग्नाची व्यवस्था करणारा मध्यस्थ; प्रभाकर भाऊराव पाटील, पोलिस उपनिरीक्षक (स. सा. - १३); एसआय मधुकर गिते (स. सा. -१४), तपासी अधिकारी; आणि ऋषी शिओणकर सहा. पोलिस निरीक्षक (स. सा. - १५). पंधरा साक्षीदारांपैकी सात साक्षीदार उलटले. दिनांक २९ एप्रिल, १९९७ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार, आपल्या पत्नीवर रॉकेल ओतून आणि तिला पेटवून देऊन तिचा खून

---

3 संक्षिप्ततेसाठी 'एसईएम'

केल्याबद्दल न्यायचौकशी न्यायालयाने अपीलकर्त्याला दोषी ठरवले. त्याला जन्मठेपेची शिक्षा आणि दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. अपीलकर्त्याला गुन्ह्याबद्दल दोषी ठरविताना, स. सा. - ९ आणि स. सा. - १४ यांनी मयत व्यक्तीच्या लेखी नोंदविलेल्या दोन मृत्युकालीन कथनांवर आणि स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षींवर, ज्यात त्यांनी मयताने त्यांना घटना कशी घडली होती त्याबाबत सांगितले होते, त्या साक्षीवर भिस्त ठेवली.

५. वरील निकालाने व्यथित होऊन, अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात अपील दाखल केले. जरी दोन लेखी मृत्युकालीन कथनांच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या अपीलकर्त्याच्या विनंतीला उच्च न्यायालयाने कायम केले, तरी स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षीसह मृत व्यक्तीच्या आणि अपीलकर्त्याच्या कपड्यांवर संबंधित रासायनिक विश्लेषकाचा अहवाल, ज्यात त्या कंपड्यांवर रॉकेल आढळले, त्यास योग्य मानून न्यायचौकशी न्यायालयाचा न्यायनिर्णय कायम करण्यात आला आणि अपीलकर्त्याने दाखल केलेले अपील फेटाळण्यात आले. सदर आदेशाला अपीलकर्त्याने प्रस्तुत अपीलात आव्हान दिले आहे.

६. जरी उच्च न्यायालयाने मयताची दोन लेखी मृत्यूकालीन कथने, पहिले त. अ. ने नोंदविलेले (नि. ४७) आणि दुसरे एसईएम यांनी नोंदविलेले (नि. ३८), फेटाळून लावली असली तरीही, मयत महिलेने तिचे वडील, रामकृष्ण महादेव उचले (स. सा. - २) आणि मध्यस्थ, बालाजी मोहोड (स. सा. - १२) यांना दिलेल्या तोंडी मृत्यूकालीन

कथनावर चुकीच्या पद्धतीने भिस्त ठेवून उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा न्यायनिर्णय कायम केला या कारणास्तव अपीलकर्त्याचे विद्वान वकील श्री. रोहन थनवानी यांनी आक्षेपित न्यायनिर्णयास विरोध केला आहे. विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, स. सा. - ९ आणि स. सा. - १४ यांच्यासमोर मयत महिलेने केलेल्या विधानांमध्ये आणि स. सा. - २ आणि स. सा. १२ यांच्यासमोर केलेल्या विधानांमध्ये स्पष्ट महत्वाचे विरोधाभास होते कारण स. सा. - ९ समोर मयत महिलेने असा दावा केला होता की, अपीलकर्ता आणि कुसुम गायकवाड (स. सा. - ८) यांच्यातील अनैतिक संबंध हे या दाम्पत्यामधील भांडणाचे मूळ कारण होते, याउलट स. सा. - २ आणि स. सा. - १२ च्या म्हणण्यानुसार हा सगळा प्रकार अपीलकर्त्याने मृत व्यक्तीकडे केलेल्या हुंड्याच्या मागणीमुळे घडला होता. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, पहिल्या आणि दुसऱ्या लेखी मृत्यूकालीन कथनात नोंदवलेले मृत व्यक्तीचे विधान हे स. सा. - २ आणि स. सा. - १२ ने न्यायालयासमोर दिलेल्या कथनापेक्षा पूर्णपणे वेगळे होते. खरे तर, स. सा. - २ किंवा स. सा. - १२ या दोघांनीही फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८[4] च्या कलम १६१ अन्वये पोलिसांना कोणतेही जबाब दिले नव्हते आणि खटल्यादरम्यान साक्षीदाराच्या पिंजऱ्यात प्रवेश केल्यानंतरच या दोन्ही साक्षीदारांनी प्रथमच जबाब दिला होता.

७. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, सदर जबाब

4 संक्षिप्ततेसाठी 'फौ. प्र. सं.'

नोंदविण्यात अनेक स्पष्ट त्रुटी असल्याच्या कारणास्तव एकदा उच्च न्यायालयाने मृत व्यक्तीचे लेखी मृत्यूकालीन कथने फेटाळून लावल्यानंतर स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांना मयत व्यक्तीने कथितरीत्या दिलेल्या तोंडी जबाबांवर, जे तितकेच अविश्वसनीय होते, त्यावर उच्च न्यायालयास अवलंबून राहण्याचे कोणतेही योग्य कारण नव्हते. आणि म्हणूनच, मृताच्या लेखी मृत्युकालीन कथनांप्रमाणेच ते जबाब फेटाळावयास हवे होते. जेथे अनेक मृत्युकालीन कथने आहेत आणि प्रत्येक कथन दुसऱ्याशी विसंगत आहे, तेथे सदर सर्व मृत्युकालीन कथने विनासंकोच फेटाळली पाहिजेत, या आपल्या युक्तिवादाला पुष्टी देण्यासाठी विद्वान वकिलांनी **नल्लापती शिवय्या वि. उपविभागीय अधिकारी, गुंटूर, आंध्र प्रदेश**[5] या प्रकरणांचा उल्लेख केला आहे. **अरविंद सिंग वि. बिहार राज्य**[6]**, अरुण भांडूदास पवार वि. महाराष्ट्र राज्य**[7] **आणि पूनम बाई वि. छत्तीसगढ राज्य**[8] या प्रकरणांचा उल्लेख करीत, डॉक्टरांच्या अनुपस्थितीत कुटुंबातील सदस्याला दिलेल्या तोंडी मृत्युकालीन कथनाच्या अविश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

८. दुसरीकडे, उत्तरवादी- महाराष्ट्र राज्याच्या वतीने उपस्थित विद्वान वकील श्री सचिन पाटील यांनी आपली नेहमीच्या आवेशाने विरुद्ध पक्षाने केलेल्या युक्तिवादावर आक्षेप घेतला आणि असे नमूद केले की, दोन्ही लेखी मृत्युकालीन कथने, म्हणजेच

5 (२००७) १५ एससीसी ४६५

6 (२००१) ६ एससीसी ४०७

7 (२००८) ११ एससीसी २३२

8 (२०१९) ६ एससीसी १४५

पहिले तपासी अधिकाऱ्याने दुपारी ३.२० वाजता नोंदविलेले आणि दुसरे एसईएम (स. सा. - ९) यांनी त्याच दिवशी दुपारी ४.३० वाजता नोंदविलेले, ही सुसंगत होती आणि मयत व्यक्तीने स्पष्टपणे असे सांगितले होते की, अपीलकर्त्यानेच तिला पेटवून दिले होते. मृत महिलेचे जबाब नोंदवण्यापूर्वी उपस्थित डॉक्टरांनी (स. सा. - १०) दिलेल्या दोन स्वास्थ्य प्रमाणपत्रांचाही त्यांनी उल्लेख केला आणि असा युक्तिवाद केला की, सदर प्रमाणपत्रे असे दर्शवितात की, ती निकोप मनस्थितीत होती आणि साक्ष देण्यास सक्षम होती. त्याचप्रमाणे, मृत महिलेने नंतर तिच्या वडिलांच्या (स. सा. - २) आणि मध्यस्थ (स. सा. - १२) यांच्या उपस्थितीत दिलेली तोंडी मृत्युकालीन कथनेदेखील पीडितेच्या म्हणण्याशी सुसंगत आणि विश्वासास पात्र असल्याचे नमूद केले गेले. मृत व्यक्तीला ज्या पद्धतीने पेटविण्यात आले, त्याचे वर्णन सुसंगत असल्याचे नमूद करण्यात आले होते आणि असा युक्तीवाद करण्यात आला की अभियोग पक्षाच्या सदर साक्षीदारांच्या उलटतपासणीमधून वरील बाबीवर अपीलकर्त्याला अनुकूल असे काहीही निष्पन्न झाले नव्हते. विद्वान सरकारी वकिलांनी घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेल्या मृत व्यक्तीच्या आणि अपीलकर्त्याच्या कपड्यांसंदर्भात रासायनिक विश्लेषकांच्या अहवालाचा उल्लेख करीत अशी विनंती केली की, त्यामुळे अपीलकर्त्याने मयत व्यक्तीवर रॉकेल ओतून तिला पेटवून दिले या अभियोग पक्षाच्या म्हणण्यास आधार मिळाला.

९. जिथे परस्परविरोधी मृत्युकालीन कथने आहेत, तेथे जोवर मृत व्यक्तीचा

मूळ जबाब सुसंगत राहिल्याची न्यायालयाची खात्री होते, तोवर न्यायालय एक कथन स्वीकारू शकते आणि दुसरे फेटाळू शकते या त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, राज्याच्या विद्वान वकिलांनी **उत्तर प्रदेश राज्य वि. वीरपाल आणि अन्य एक**[9], **रिझान आणि अन्य एक वि. छत्तीसगढ राज्य** [10] आणि **भगवान तुकाराम डांगे वि. महाराष्ट्र राज्य**[11] या प्रकरणांचा दाखला दिला. **त्रिमुख मारोती किरकण वि. महाराष्ट्र राज्य**[12] या प्रकरणातील निकालाचा उल्लेख करून असे नमूद करण्यात आले की, लोकांच्या नजरेपासून दूर राहून घराच्या खाजगी भागात मृत्यू कसा झाला याचा खुलासा करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे.

१०. पक्षकारांच्या विद्वान वकिलांनी मांडलेले युक्तिवाद आम्ही विचारपूर्वक विचारात घेतले आहेत आणि अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील संपूर्ण मुद्दा हा मृत व्यक्तीने दिलेल्या मृत्युकालीन कथनांची ग्राह्यता आणि त्यांच्या पुराव्याच्या मूल्यावर अवलंबून आहे, ज्यापैकी दोन स. सा. - ९ आणि स. सा. - १४ यांनी लेखी नोंदविलेले होते आणि इतर दोन हे मयत व्यक्तीने स. सा. - २ आणि स. सा. - १२ ला तोंडी सांगितले होते.

११. मृत्युकालीन कथन हे एखादया व्यक्तीने, जेव्हा घोषित करणाऱ्यास त्याच्या जिवंत राहण्याची जवळजवळ शून्य शक्यता आहे याची जाणीव असते, त्या

---

9 (२००२) ४ 4 एससीसी ७४१

10 (२००३) २ एससीसी ६६१

11 (२०१४) ४ एससीसी २७०

12 (२००६) १० एससीसी ६८१

टप्प्यावर, त्याच्या जवळ येऊन ठेपलेल्या मृत्यूच्या कारणाबाबत किंवा ज्या घडामोडीचे पर्यवसान तशा प्रसंगात झाले, त्याबाबत केलेले शेवटचे विधान असते. अशा नाजूक अवस्थेत एखादी व्यक्ती खरे सांगणे अपेक्षित आहे, या गृहितकावर न्यायालयाने अशा विधानाच्या सत्यतेला खूप महत्त्व दिले आहे. भारतीय पुरावा अधिनियम, १८७२[13] च्या कलम ३२ मध्ये असे नमूद केले आहे की, ज्या कामात एखादया व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला असेल त्या कामात, जेव्हा त्या व्यक्तीने आपल्या मृत्यूच्या कारणासंबंधी किंवा ज्या घडामोडीचे पर्यवसान तिच्या मृत्युत झाले त्यातील कोणत्याही परिस्थितीविशेषासंबंधी कथन केले असेल तेव्हा मयत बळी व्यक्तीने साक्षीदारास केलेले तोंडी अथवा लेखी, असे कथन संबद्ध कथन असते आणि पुराव्यात ग्राह्य असते. 'ऐकीव पुरावा अग्राह्य आहे' या पुरावा अधिनियमाच्या कलम ६० मधील सर्वसाधारण नियमाला सदर तरतूद अपवाद आहे आणि जेव्हा असा पुरावा प्रत्यक्ष असेल आणि उलटतपासणीद्वारे पडताळणी करण्यात आला असेल तरच तो विश्वासार्ह मानला जातो, हे लक्षात घेण्याजोगे आहे.

१२. **<u>कुंडुला बाला सुब्रमण्यम आणि अन्य एक वि. आंध्र प्रदेश राज्य</u>**[14] या प्रकरणात या न्यायालयाने मृत्युकालीन कथनाचे महत्त्व खालील शब्दांत अधोरेखित केले होते -

"१८. ऐकीव पुरावा ग्राह्य पुरावा नसतो आणि जोपर्यंत

13 संक्षिप्ततेसाठी 'पुरावा अधिनियम'

14 (१९९३) २ एससीसी ६८४

उलटतपासणीद्वारे पुरावा तपासला जात नाही तोपर्यंत तो विश्वासार्ह नाही, या सर्वसाधारण नियमाला पुरावा अधिनियामाचे कलम ३२ (१) हे अपवाद आहे, कलम ३२ अन्वये, ज्या कामात एखादया व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबतचा प्रश्न उपस्थित झाला असेल त्या कामात, जेव्हा त्या व्यक्तीने आपल्या मृत्यूच्या कारणासंबंधी किंवा ज्या घडामोडीचे पर्यवसान तिच्या मृत्युत झाले त्यातील कोणत्याही परिस्थितीविशेषासंबंधी कथन केले असेल तेव्हा मयत बळी व्यक्तीने साक्षीदारास केलेले तोंडी अथवा लेखी, असे कथन संबद्ध कथन असते आणि पुराव्यात ग्राह्य असते. मृत व्यक्तीने केलेले विधान, ज्याला मृत्यूकालीन कथन असे म्हणतात, ते त्या श्रेणीत मोडते, जर ते मृत व्यक्तीने योग्य मानसिक स्थितीत असताना केले असेल तर. मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या व्यक्तीने केलेल्या मृत्यूकालीन कथनाला विशेष पावित्र्य असते, कारण त्या गंभीर क्षणी एखादी व्यक्ती कोणतेही असत्य विधान करण्याची शक्यता नसते. येणाऱ्या मृत्यूची सावली ही स्वतःच, मृत व्यक्तीने त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरणाऱ्या कारणांबद्दल किंवा परिस्थितीबद्दल केलेल्या विधानाच्या सत्यतेची हमी असते. त्यामुळे मृत्यूकालीन कथनाला पुराव्याचा भाग म्हणून

जवळजवळ पवित्र दर्जा प्राप्त आहे, कारण ते मृत पीडित व्यक्तीच्या तोंडून असते. मृत व्यक्तीचा जबाब आणि त्याबाबत साक्ष देणाऱ्या साक्षीदारांचे पुरावे न्यायालयांच्या काळजीपूर्वक तपासणीच्या कसोटीवर उत्तीर्ण झाले की, तो अत्यंत महत्त्वाचा आणि विश्वासार्ह पुराव्याचा भाग ठरतो आणि जर न्यायालयाची अशी खात्री झाली की, मृत्यूकालीन कथन खरे आहे आणि त्यात कोणतीही अतिशयोक्ती नाही, तर कोणत्याही परिपोषक पुराव्याचा शोध न घेताही, असे मृत्यूकालीन कथनच दोषसिद्धी नोंदविण्यासाठी पुरेसे ठरू शकते......."

१३. **शुधाकर वि. मध्य प्रदेश राज्य**[15] या प्रकरणात या न्यायालयाने असे मत व्यक्त केले होते की, एकदा मृत्यूकालीन कथन विश्वासार्ह ठरले की, ते दोषसिद्धीसाठी आधार ठरू शकते आणि खालील निरीक्षणे नोंदवली होती :

"२०. 'मृत्यूकालीन कथन' हे एखाद्या व्यक्तीने अशा टप्प्यावर केलेले शेवटचे विधान असते, जेव्हा त्याला त्याच्या मृत्यूची गंभीर भीती असते आणि त्याच्या जगण्याची कोणतीही शक्यता नसते. अशा वेळी ही अपेक्षा असते की, एखादी व्यक्ती सत्य आणि फक्त सत्यच बोलेल. सामान्यत: अशा परिस्थितीत, न्यायालये अशा

15 (२०१२) ७ एससीसी ५६९

विधानाला सत्यतेचे आंतरिक मूल्य देतात. एकदा असे विधान स्वेच्छेने केले गेले की, ते विश्वासार्ह असते आणि सत्य झाकण्याचा किंवा एखाद्या व्यक्तीला खोटे गुंतविण्याचा मृत व्यक्तीचा प्रयत्न नसतो, तेव्हा न्यायालये अशा मृत्यूकालीन कथनावर सुरक्षितपणे अवलंबून राहू शकतात आणि ते दोषसिद्धीसाठी आधार बनू शकते. इतकेच नव्हे तर, जिथे मृत व्यक्तीने मृत्यूकालीन कथन म्हणून केलेल्या विधानास अभियोग पक्षाच्या इतर पुराव्यांद्वारे समर्थन आणि पुष्टी दिली जाते, तेथे अशा मृत्यूकालीन कथनाच्या सत्यतेबद्दल न्यायालयांना शंका घेण्याचे काहीही कारण नसते."

१४. **<u>पाणिबेन (श्रीमती) वि. गुजरात राज्य</u>**[16] या प्रकरणात, तपासणी केल्यावर **मृत्यूकालीन कथनाचे नियमन करणाऱ्या तत्वांवरील** कायदयाच्या संपूर्ण सारांशाची तपासणी केल्यानंतर, या न्यायालयाने असा निष्कर्ष काढला होता की -

"१८. ...... (i) मृत्यूकालीन कथनावर परिपोषक पुराव्याशिवाय कार्यवाही करता येऊ शकत नाही, असा कायदयाचा कोणताही नियम नाही अथवा सूत्र नाही. (मुन्नू राजा वि. म.प्र. राज्य.[17] )

(ii) जर न्यायालयाची अशी खात्री झाली की, मृत्यूकालीन कथन

---

16 (१९९२) २ एससीसी ४७४

17 (१९७६) ३ एससीसी १०४

खरे आणि स्वेच्छेने दिलेले आहे, तर त्याआधारे न्यायालय त्याबाबत पुष्टी न करता, दोषसिद्धी करू शकते. (उत्तर प्रदेश राज्य वि. राम सागर यादव[18]; रमावती देवी वि. बिहार राज्य[19]).

iii) या न्यायालयाने मृत्यूकालीन कथनाची काळजीपूर्वक छाननी केली पाहिजे आणि ते कथन कोणाच्याही शिकवणीचा, सांगण्याचा किंवा कल्पनाशक्तीचा परिणाम नाही याची खात्री केली पाहिजे. हल्लेखोरांचे निरीक्षण करण्याची आणि त्यांना ओळखण्याची मयत व्यक्तीला संधी होती आणि ती कथन करण्यासाठी योग्य अवस्थेत होती. (के. रामचंद्र रेड्डी वि. सरकारी वकील[20]).

iv) जेथे मृत्यूकालीन कथन संशयास्पद असेल, तेथे सबळ परिपोषक पुराव्याशिवाय कार्यवाही करू नये. (रशीद बेग विरुद्ध म.प्र. राज्य[21])

v) जेथे मृत व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत होती आणि कधीही मृत्यूकालीन कथन करू शकली नाही, तेथे त्यासंदर्भातील पुरावे नाकारले पाहिजेत. (काके सिंग वि. म. प्र. राज्य[22]).

18 (१९८५) १ एससीसी ५५२
19 (१९८३) १ एससीसी २११
20 (१९७६) ३ एससीसी ६१८
21 (१९७४) ४ एससीसी २६४
22 १९८१ पुरवणी एससीसी २५

$vi$) दुर्बलतेने ग्रासलेले मृत्यूकालीन कथन हा दोषसिद्धीचा आधार ठरू शकत नाही. (राम मनोरथ विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य[23]).

Vii) मृत्यूकालीन कथनात घटनेचे तपशील नाहीत म्हणून केवळ ते नाकारला जाऊ नये. (महाराष्ट्र राज्य वि. कृष्णमूर्ती लक्ष्मीपती नायडू[24]).

Viii) त्याचप्रमाणे केवळ ते एक संक्षिप्त विधान आहे म्हणून ते नाकारले जात नाही. उलट विधानाचा संक्षिप्तपणाच सत्याची हमी देतो. (सूरजदेव ओझा वि. बिहार राज्य[25]).

ix) सामान्यत: मृत्यूकालीन कथन करण्यासाठी मृत व्यक्ती योग्य मानसिक स्थितीत होती की नाही याची खात्री करण्यासाठी न्यायालय वैद्यकीय मत विचारात घेतात. परंतु जिथे प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने म्हटले आहे की, मृत व्यक्ती ही मृत्यूकालीन कथन करण्यासाठी योग्य अवस्थेत आणि शुद्धीवर होती, तेथे वैद्यकीय मत प्रबळ होऊ शकत नाही. (नानाहौ राम विरुद्ध म.प्र. राज्य[26]).

x) जिथे अभियोग पक्षाचे म्हणणे हे मृत्यूकालीन कथनापेक्षा वेगळे असेल, तेथे सदर कथनावर कार्यवाही करता येऊ शकत

23 (१९८१) २ एससीसी ६५४

24 १९८० पुरवणी एससीसी ४५५

25 १९८० पुरवणी एससीसी ७६९

26 १९८८ पुरवणी एससीसी १५२

नाही. (उ. प्र. राज्य वि. मदन मोहन[27]).

१५. ज्या प्रकरणांत मयत व्यक्तीने केलेल्या अनेक मृत्यूकालीन कथनांचा समावेश असतो, त्या प्रकरणी सदर मृत्यूकालीन कथनांपैकी कोणत्या कथनावर न्यायालयाने विश्वास ठेवायला हवा आणि न्याय्य व कायदेशीर निष्कर्षाप्रत येण्यासाठी कोणते मार्गदर्शक घटक असावेत हा प्रश्न विचारार्थ उपस्थित होतो. जेव्हा मृत व्यक्तीने केलेली मृत्यूकालीन कथने ही परस्परविरोधी असल्याचे आढळते, तेव्हा ही समस्या अधिक कठीण होते. अशा परिस्थितीला सामोरे जाताना, सरकारी पक्षाने सादर केलेल्या इतर महत्वाच्या पुराव्यांद्वारे, मृत्यूकालीन कथनांपैकी कोणत्या कथनाला दुजोरा देता येईल, हे शोधण्यासाठी न्यायालयाने पुराव्यांची बारकाईने छाननी करणे अपेक्षित आहे. संबंधित वेळी मृत व्यक्तीची स्थिती, मृत व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती दर्शविणारे अभिलेखावर सादर केलेले वैद्यकीय पुरावे, जवळच्या नातेवाईकांना / कुटुंबातील सदस्यांनी मृत व्यक्तीला प्रभावित करण्याची /शिकवण देण्याची मोकळीक आणि न्यायालयाला आपल्या विवेकाचा वापर करण्यास मदत करणारी इतर सर्व आनुषंगिक परिस्थिती तितकीच महत्त्वाची आहे.

१६. **<u>लखन वि. मध्य प्रदेश राज्य</u>**[28] या प्रकरणात, जिथे मृत महिलेवर रॉकेल ओतून जाळण्यात आले आणि आरोपी आणि त्याच्या कुटुंबियांनी तिला रुग्णालयात आणले, तेव्हा न्यायालयाच्या लक्षात आले की, तिने दोन वेगवेगळी मृत्यूकालीन

27 (१९८९) ३ एससीसी ३९०

28 (२०१०) ८ एससीसी ५१४

कथने केली होती आणि असा निर्णय दिला की :

"९. मृत्यूकालीन कथनाचा सिद्धांत 'नेमो मोरिटुरस प्रेसुमितुर मेंटिअर' (म्हणजेच मृत्यूसमयी कोणीही खोटे बोलत नाही असे गृहितक आहे) या कायदेशीर सूत्रात अंतर्भूत आहे, ज्याचा अर्थ असा आहे की "माणूस खोटे बोलून आपल्या निर्मात्याला भेटणार नाही". पुरावा अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये मृत्यूकालीन कथनाचा सिद्धांत अंतर्भूत आहे (यापुढे 'पुरावा अधिनियम' असे संबोधण्यात आले आहे), जो पुरावा अधिनियमाच्या कलम ६० मध्ये समाविष्ट असलेल्या सर्वसाधारण नियमास अपवाद आहे, ज्यात अशी तरतूद आहे की, सर्व प्रकरणांमध्ये तोंडी पुरावा प्रत्यक्ष असला पाहिजे म्हणजेच तो पुरावा म्हणजे आपण ते पाहिले अशी साक्षीदाराने दिलेली साक्ष असली पाहिजे. मृत्यूकालीन कथन म्हणजे खरं तर, ज्याला साक्षीदार म्हणता येणार नाही, अशा एखाद्या व्यक्तीचा जबाब आहे, आणि म्हणूनच त्याची उलटतपासणी केली जाऊ शकत नाही. विशिष्ट प्रकरणांत अशी विधाने स्वत:च संबद्ध तथ्ये असतात.

१०. या न्यायालयाने वेगवेगळ्या परिस्थितीत नोंदविण्यात आलेल्या आणि एकापेक्षा अधिक मृत्यूकालीन कथने नोंदविण्यात

आलेल्या प्रकरणांमध्येसुद्धा मृत्यूकालीन कथनांची संबद्धता / पुरावा मूल्य वेळोवेळी विचारात घेतले आहे. कायदा असा आहे की, जर न्यायालयाची अशी खात्री झाली की, मृत्यूकालीन कथन खरे आहे आणि मयत व्यक्तीने ते स्वेच्छेने केले आहे, तर पुढील कोणतीही पुष्टी न करता, केवळ त्याआधारे दोषसिद्धी होऊ शकते. पुष्टी ना करता, मृत्यूकालीन कथनावर विसंबून राहता येत नाही, असा कायदयाचा कोणताही नियम अथवा सूत्र नाही. जेव्हा मृत्यूकालीन कथन संशयास्पद असते, तेव्हा त्यास पुष्टी देणाऱ्या पुराव्याशिवाय त्यावर विसंबून राहू नये. न्यायालयाने मृत्यूकालीन कथनाची काळजीपूर्वक छाननी केली पाहिजे आणि आणि ते कथन कोणाच्याही शिकवणीचा, सांगण्याचा किंवा कल्पनाशक्तीचा परिणाम नाही याची खात्री केली पाहिजे. मृत व्यक्ती कथन करण्यासाठी योग्य मनस्थितीत असली पाहिजे आणि तिने हल्लेखोरांना ओळखले पाहिजे. मृत्यूकालीन कथनात घटनेचे तपशील नाहीत म्हणून केवळ ते नाकारता येऊ शकत नाही आणि जर केवळ संक्षिप्त विधान असेल तर, ते अधिक विश्वासार्ह आहे कारण विधानाची संक्षिप्तता हीच त्याच्या सत्यतेची हमी आहे. दुर्बलतेने ग्रासलेले मृत्यूकालीन कथन हा

दोषसिद्धीचा एकमेव आधार ठरू शकत नाही. जिथे अभियोग पक्षाचे म्हणणे हे मृत्यूकालीन कथनापेक्षा वेगळे असेल, तेथे सदर कथनावर कार्यवाही करता येऊ शकत नाही. (खुशाल राव वि. मुंबई राज्य[29], रशीद बेग वि. म.प्र. राज्य।[30] के. रामचंद्र रेड्डी वि. सरकारी वकील[31][32], महाराष्ट्र राज्य वि. कृष्णमूर्ती लक्ष्मीपती नायडू, उका राम वि. राजस्थान राज्य[33], बाबूलाल वि. म.प्र. राज्य।[34], मुथू कुट्टी वि. राज्य, [35]राजस्थान राज्य वि. वाक्तेंग[36] आणि शारदा वि. राजस्थान राज्य[37] अन्वये.)"

१७. अमोल सिंग वि. मध्य प्रदेश राज्य या प्रकरणात विसंगती [38]असलेल्या दोन मृत्यूकालीन कथनांना सामोरे जाताना, न्यायालयाने अवलंबिलेल्या दृष्टिकोनाचा सारांश खालीलप्रमाणे होता :

"१३. एकापेक्षा अधिक मृत्यूकालीन कथनांच्या स्वरूपातील पुराव्यांचे आकलन करण्याबाबतीत कायदा सुस्थापित आहे. त्यानुसार, मृत्यूकालीन कथनांची बहुविधता नव्हे, तर त्यातील

29 एआयआर 1958 एससी 22
30 (१९७४) ४ एससीसी २६४
31 (१९७६) ३ एससीसी ६१८
32 1980 पुरवणी एससीसी 455
33 (२००१) ५ एससीसी २५४
34 (२००३) १२ एससीसी ४९०
35 (२००५) ९ एससीसी ११३
36 (२००७) १४ एससीसी ५५०
37 (२०१०) २ एससीसी ८५
38 (२००८) ५ एससीसी ४६८

विश्वासार्हता अभियोग पक्षाचा दावा सबळ करते. जर मृत्यूकालीन कथन हे स्वेच्छेने, विश्वासार्ह आणि योग्य मानसिक स्थितीत केले असल्याचे आढळले तर कोणत्याही पुष्टीशिवाय त्यावर विसंबून राहता येऊ शकते. हे विधान सुरवातीपासून शेवटपर्यंत सुसंगत असावे. जर मृत व्यक्तीला अशा मृत्यूकालीन कथने करण्याच्या अनेक संधी होत्या, म्हणजेच जर एकापेक्षा अधिक मृत्यूकालीन कथने असतील तर, ती सुसंगत असणे आवश्यक आहे. (पाहा कुंडुला बाला सुब्रमण्यम वि. ए.पी. राज्य.[39]) परंतु, एका मृत्यूकालीन कथनात आणि दुसऱ्यात काही विसंगती आढळल्यास, न्यायालयाला विसंगतींचे स्वरूप, म्हणजे त्या महत्वाच्या आहेत की नाही हे तपासावे लागते. विविध मृत्यूकालीन कथनातील मजकुराची छाननी करताना, अशा परिस्थितीत न्यायालयाला आजूबाजूची विविध तथ्ये आणि परिस्थिती यांच्या पार्श्वभूमीवर त्याची तपासणी करावी लागते."

१८. **शेरसिंग आणि अन्य एक वि. पंजाब राज्य**[40] या प्रकरणात या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की :

"१६. मृत्यूकालीन कथनाची स्वीकारार्हता अधिक असते कारण ते

39 (१९९३) २ एससीसी ६८४

40 (२००८) ४ एससीसी २६५

कथन टोकाच्या परिस्थितीत केलेले असते. जेव्हा पक्षकार मृत्यूच्या उंबरठ्यावर असतो, तेव्हा तो खोटे बोलण्याचा हेतू क्वचितच आढळतो आणि याच कारणास्तव मृत्यूकालीन कथनाच्या प्रकरणी, शपथ आणि उलटतपासणीची आवश्यकता नसते. आरोपीला उलटतपासणीचा अधिकार नसल्याने न्यायालय आग्रही राहील की, मृत्यूकालीन कथन अशा स्वरूपाचे असावे की, ज्यामुळे न्यायालयाचा त्याच्या सत्यतेवर आणि अचूकतेवर पूर्ण विश्वास निर्माण होईल. न्यायालयाने हे सुनिश्चित केले पाहिजे की ते कथन कोणाच्याही शिकवणीचा, सांगण्याचा किंवा कल्पनाशक्तीचा परिणाम नव्हते. अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्यांवरून न्यायालयाने हे निश्चित केले पाहिजे की, मृत व्यक्ती योग्य मानसिक स्थितीत होती आणि तिला आरोपीचे निरीक्षण करण्याची आणि ओळख पटविण्याची बरीच संधी होती. सर्वसाधारणपणे, मृत्यूकालीन कथन करणारी व्यक्ती योग्य मानसिक स्थितीत होती की नाही, या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी न्यायालय वैद्यकीय पुराव्यांचा आधार घेते, परंतु जेथे जबाब नोंदविणारी व्यक्ती, मृत व्यक्ती योग्य आणि जागरूक अवस्थेत असल्याचे सांगते, तेथे वैद्यकीय मत प्रबळ ठरणार नाही,

तसेच घोषित करणाऱ्या व्यक्तीच्या मानसिक स्वास्थ्यतेबाबत डॉक्टरांचे कोणतेही प्रमाणपत्र नसल्याने मृत्यूकालीन कथन स्वीकारार्ह नाही, असे म्हणता येऊ शकत नाही. आवश्यक हे आहे की, मृत्यूकालीन कथन नोंदविणाऱ्या व्यक्तीची खात्री असली पाहिजे की, मृत व्यक्ती योग्य मनःस्थितीत होती. जेथे दंडाधिकाऱ्यांच्या साक्षीने हे सिद्ध होते की, त्या संदर्भात डॉक्टरांचे मत नसतानाही घोषित करणारी व्यक्ती कथन करण्यास सक्षम होती आणि जर न्यायालयाने शेवटी ते स्वेच्छेने केल्याचे आणि खरे असल्याचे मानले, तर त्यावर कार्यवाही केली जाऊ शकते. डॉक्टरांनी दिलेले प्रमाणपत्र हा मूलतः सावधगिरीचा नियम आहे आणि म्हणूनच एखाद्या विधानाचे ऐच्छिक आणि सत्य स्वरूप अन्यथा प्रस्थापित केले जाऊ शकते."

१९. अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाला असे आढळते की, एकापेक्षा जास्त मृत्यूकालीन कथने अस्तित्वात आहेत, त्या प्रकरणांत त्यातील प्रत्येकाची काळजीपूर्वक आणि सावधगिरीने तपासणी केली पाहिजे आणि मृत्यूकालीन कथनांपैकी कोणते कथन संशयास्पद परिस्थितीपासून मुक्त असल्याचे दिसते आणि स्वेच्छेने केले गेले आहे, याबाबत खात्री केल्यानंतरच ते स्वीकारण्यात यावे. वर उद्धृत केलेल्या न्यायनिर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, प्रत्येक प्रकरणात,

मृत्यूकालीन कथनाची पुष्टी ही प्रत्यक्ष किंवा अन्यथा संबंधित पुराव्यासह केली जाणे आवश्यक नाही. उपस्थित तथ्ये आणि परिस्थिती आणि अभिलेखावर सादर करण्यात आलेले इतर पुरावे यांवरून न्यायालये मृत्यूकालीन कथनाच्या वैधता प्राप्त करतात हा अधिक समंजसपणाचा नियम आहे. याच कारणास्तव, घोषित करणारी व्यक्ती कथन करण्यास योग्य असल्याचे डॉक्टरांनी दिलेले प्रमाणपत्र हे, मृत व्यक्तीने केलेल्या कथनाची सत्यता सिद्ध करण्यासाठी सावधगिरीचा नियम समजला जातो.

२०. **<u>कुंडुला बाला सुब्रमण्यम</u>** (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की, जर एकापेक्षा जास्त मृत्यूकालीन कथने असतील, तर ती स्वीकारण्यापूर्वी आणि त्यावर अवलंबून राहण्यापूर्वी, वेगवेगळी मृत्यूकालीन कथने महत्वाच्या तपशीलांमध्ये एकमेकांशी सुसंगत आहेत की नाही हे शोधण्यासाठी न्यायालयाने त्या प्रत्येकाची छाननी केली पाहिजे. शेवटी, प्रत्येक प्रकरणाचा निर्णय त्यातील विशिष्ट तथ्यांच्या आधारे झाला पाहिजे. ज्या वेळेस मृत व्यक्तीने मृत्यूकालीन कथन केले, त्या वेळी असलेल्या सभोवतालच्या परिस्थितीसह, न्यायालयासमोर सादर केलेल्या पुराव्यांचे मूल्यमापन करण्याबाबत कोणताही कठोर नियम असू शकत नाही. या कार्यवाहीची ऐच्छिकता सुनिश्चित करणे, कोणीही शिकवले किंवा सांगितलेले नाही याची खात्री होणे, मृत्यूकालीन कथन करण्यापूर्वी मृत व्यक्ती योग्य मनःस्थितीत होती याबाबत खात्री करून घेणे, आरोपीची ओळख पटविण्यासाठी घोषित करणाऱ्या व्यक्तीस बरीच संधी उपलब्ध होती याची खातरजमा करणे यावर न्यायालयाचे विशेष

भर आहे.

२१. <u>**वीरपाल**</u> (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, मृत्यूकालीन कथनावर इतर कोणत्याही परिपोषक पुराव्याशिवाय कार्यवाही केली जाऊ शकते आणि खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे :

> "१६. आता कुठल्याही परिपोषक पुराव्याच्या अनुपस्थितीत केवळ मृत्यूकालीन कथनाच्या आधारे दोषसिद्धी होऊ शकते का, या मुद्द्याचा संबंध आहे, तर मुन्नू राजा[41] या प्रकरणातील न्यायालयाचा निर्णय आणि त्यानंतर पाणीबेन वि. गुजरात राज्य[42] प्रकरणातील निर्णयाचा संदर्भ देणे आवश्यक आहे. वरील निर्णयांमध्ये विशिष्टपणे असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे की, पुष्टी न करता, मृत्यूकालीन कथनावर कार्यवाही करता येऊ शकत नाही, असा कायदयाचा कोणताही नियम किंवा सूत्रसुद्धा नाही. असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे आणि असा निर्णय देण्यात आला आहे की, मृत्यूकालीन कथन खरे आहे आणि स्वेच्छेने केले आहे अशी जर न्यायालयाची खात्री झाली असेल तर, त्याआधारे न्यायालय पुष्टी न करता, दोषसिद्धी करू शकते. उत्तर प्रदेश राज्य वि. राम सागर यादव[43] आणि रमावती देवी वि.

41 (१९७६) ३ एससीसी १०४

42 (१९९२) २ एससीसी ४७४

43 (१९८५) १ एससीसी ५५२

> बिहार राज्य।[44] या प्रकरणांतसुद्धा अशाच प्रकारचा दृष्टिकोन व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे पुष्टी न करता, केवळ मृत्यूकालीन कथनाच्या आधारे दोषसिद्धी होऊ शकते."

२२. परंतु, मृत्यूकालीन कथनात काही कमकुवतपणा असल्यास, आरोपींना दोषी ठरवण्यासाठी ते एकमेव आधार असू शकत नाही. अशा परिस्थितीत, न्यायालयाने एक पाऊल मागे घेऊन, प्रकरणातील एकत्रित घटकांमुळे त्या मृत्यूकालीन कथनावर विसंबून राहणे कठीण होते का? या बाबीचा विचार केला पाहिजे. या संदर्भात, **<u>नल्लापती शिवय्या</u>** (उपरोल्लेखित) या प्रकरणाचा संदर्भ देणे उपयुक्त ठरेल, ज्यात या न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला :

> "४६. आरोपीविरुद्ध वाजवी संशयापलीकडे आरोप सिद्ध करणे हे अभियोग पक्षाचे कर्तव्य आहे. संशयाचा फायदा नेहमीच आरोपीला दिला गेला पाहिजे. हे खरे आहे की, मृत्यूकालीन कथन हे स्वेच्छेने केलेले आणि सत्य होते आणि पीडित व्यक्ती ही योग्य मनस्थितीत होती हे जर सिद्ध झाले असेल तर, मृत्यूकालीन कथन हा विश्वास ठेवण्याजोगा एक ठोस पुरावा आहे. न्यायवैद्यक प्राध्यापकांच्या साक्षीमुळे, स्वेच्छेने आणि सत्य कथन करण्याच्या मृत व्यक्तीच्या स्थितीबद्दल बरीच शंका उपस्थित होते. त्यामुळेच

---

44 (१९८३) १ एससीसी २११

मृत्यूकालीन कथन करण्यासाठी पीडित व्यक्तीच्या स्थितीबद्दल प्रमाणित करणाऱ्या डॉक्टरची प्रत्येक प्रकरणात तपासणी होणे कायद्यानुसार आवश्यक आहे म्हणून नव्हे, तर खटल्याच्या विशिष्ट परिस्थितीत उपलब्ध असलेल्या परिपोषक पुरावे सिद्ध करणे हे अभियोग पक्षाचे कर्तव्य होते आणि म्हणून दोन्ही मृत्यूकालीन कथने नोंदविण्याच्या वेळी उपस्थित असलेले अपघात विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. टी. नरसिंहराव यांची तपासणी न होणे याला काही प्रमाणात महत्त्व प्राप्त झाले आहे.

xxxx xxxx xxxx

५२. मृत्यूकालीन कथनातून विश्वास निर्माण झाला पाहिजे जेणेकरून त्यावर कार्यवाही करणे सुरक्षित असेल. मृत्यूकालीन कथनावर कार्यवाही करणे सुरक्षित आहे की नाही हे, केवळ मृत्यूकालीन कथन नोंदविणाऱ्या व्यक्तीच्या, मग तो दंडाधिकारी जरी असेल, त्याच्या साक्षीवर अवलंबून नसते, तर अभिलेखावर उपलब्ध असलेल्या सर्व सामग्री आणि वैद्यकीय पुराव्यासह परिस्थितीवर सुद्धा अवलंबून असते. योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक प्रकरणात पुरावे आणि अभिलेखावर उपलब्ध असलेल्या सामग्रीची योग्य प्रकारे विचारात घेणे

आवश्यक आहे. मृत्यूकालीन कथन करणारी व्यक्ती सजग आणि जबाब देण्यास योग्य होती, याबाबत न्यायालयाने स्वतःची खात्री केली पाहिजे, त्यासाठी केवळ मृत्यूकालीन कथन नोंदविणाऱ्या व्यक्तींचे पुरावेच नव्हे, तर वैद्यकीय पुरावे आणि परिस्थितीसह इतर पुराव्यांचा एकत्रित परिणामही विचारात घेतला पाहिजे."

२३. **<u>अरविंद सिंग</u>** (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, मृत्यूकालीन कथनाचा काळजीपूर्वक आणि सावधगिरीने विचार करणे आवश्यक आहे आणि कथनाचे साक्षीपुरावादृष्ट्या मूल्य बळकट करण्यासाठी, जरी आवश्यक नसले तरी, त्याची पुष्टी करणे उपयुक्त आहे. जेथे स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध नसतील, तेथेसुद्धा विश्वासार्ह पुरावा म्हणून असे कथन स्वीकारताना सर्व खबरदारी घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, जरी थेट पुरावा उपलब्ध नसला तरी, घटनांच्या साखळीत खंड न नसलेल्या परिस्थितीजन्य पुराव्यामुळे मृत्यूकालीन कथनाच्या साक्षीपुरावादृष्ट्या मूल्यात भर पडेल.

२४. ज्या परिस्थितीत न्यायालये पुराव्याशिवाय मृत्यूकालीन कथने स्वीकारू शकतात, त्या परिस्थितीचे नियमन करणारी तत्त्वे **<u>खुशाल राव</u>** (उपरोल्लेखित) या प्रकरणात विस्तृतपणे हाताळण्यात आली आहेत आणि सुलभ संदर्भासाठी, ती खालीलप्रमाणे पुनः उद्धृत करण्यात आली आहेत :

"१६. पुरावा अधिनियमातील संबंधित तरतुदींचा आणि भारतातील विविध उच्च न्यायालयांमधील आणि या न्यायालयातील निर्णीत प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर, आम्ही मद्रास उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाच्या वरील मताशी सहमती दर्शवत या निष्कर्षावर पोहोचलो आहोत की, (१) पुष्टी केल्याशिवाय मृत्यूकालीन कथन हे दोषसिद्धीसाठी एकमेव आधार असू शकत नाही असा कायदयाचा कोणताही पूर्ण नियम आखून देता येऊ शकत नाही ; (२) असे की, मृत्यूकालीन कथन कोणत्या परिस्थितीत करण्यात आले हे लक्षात घेऊन प्रत्येक प्रकरणातील स्वतःच्या तथ्यांच्या आधारे प्रकरण निश्चित केले पाहिजे ; (३) असे की, मृत्यूकालीन कथन हे इतर पुराव्यांपेक्षा कमकुवत प्रकारचा पुरावा आहे, असे सर्वसाधारण प्रतिपादन म्हणून मांडता येत नाही; (४) असे की, मृत्यूकालीन कथन आणि इतर पुरावे एकाच स्तरावर आहेत आणि सभोवतालच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणि पुराव्यांच्या योग्यतेचे नियमन करणाऱ्या तत्वांच्या संदर्भात त्याचा न्याय करणे आवश्यक आहे ; (५) असे की, सक्षम दंडाधिकाऱ्यांनी योग्य पद्धतीने, म्हणजे प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात आणि शक्य तितक्या व्यवहार्यपणे,

घोषणा करणाऱ्या व्यक्तीच्या शब्दांत नोंदवलेल्या मृत्यूकालीन कथनास, मानवी स्मरणशक्ती आणि मानवी चारित्र्याच्या सर्व कमकुवतपणाने ग्रस्त असलेल्या तोंडी साक्षीपुराव्यावर अवलंबून असलेल्या मृत्यूकालीन कथनापेक्षा अधिक वरचे स्थान प्राप्त होते ; आणि (६) असे की, मृत्यूकालीन कथनाची विश्वासार्हता तपासण्याकरिता, मरणासन्न व्यक्तीला निरीक्षणाची असलेली संधी, उदाहरणार्थ रात्री गुन्हा घडला असेल तर तेथे पुरेसा प्रकाश होता का; नमूद केलेली तथ्ये लक्षात ठेवण्याची माणसाची क्षमता ही, कथन करताना त्याच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे बिघडली नव्हती का; जर त्याला त्याच्या अधिकृत नोंदीव्यतिरिक्त मृत्यूकालीन कथन करण्याच्या अनेक संधी मिळाल्या असतील तर ते विधान सुरुवातीपासून शेवटपर्यंत सुसंगत राहिले आहे; आणि कथन लवकरात लवकर करण्यात आले होते आणि ते हितसंबंधी पक्षकारांच्या शिकवणीचा परिणाम नव्हते, यांसारख्या परिस्थिती न्यायालयाला लक्षात घ्याव्या लागतील. "

२५. दंडाधिकाऱ्यांनी नोंदवलेल्या मृत्यूकालीन कथनाची विश्वासार्हता देखील अनेक प्रकरणांमध्ये विचारार्थ आली आहे आणि असा निर्णय देण्यात आला आहे की,

दंडाधिकारी हा हितसंबंध नसलेला साक्षीदार आणि एक आदरणीय अधिकारी असल्यामुळे आणि त्याला आरोपीविरुद्ध कोणत्याही प्रकारची द्वेषबुद्धी असेल किंवा मृत्यूकालीन कथनाचा बनाव करण्यात कोणत्याही प्रकारे त्याला रस असेल, असा संशय घेण्यासाठी कोणताही परिस्थिति किंवा सामग्री नसल्यामुळे, दंडाधिकाऱ्याने नोंदवलेल्या अशा प्रकारच्या कथनावर शंका घेतली जाऊ नये. मृत्यूकालीन कथनाच्या आधारे आरोपीला दोषी ठरविण्यासाठी परिपोषक साक्षीपुराव्याचा अभाव हा अनेक प्रकरणांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे [संदर्भ: **मुन्नू राजा** (उपरोल्लेखित), **पाणीबेन (श्रीमती)** (उपरोल्लेखित), **राम सागर यादव** (उपरोल्लेखित), **रमावती देवी** (उपरोल्लेखित) आणि **वीरपाल** (उपरोल्लेखित)].

२६. प्रस्तुत प्रकरणाकडे पुनः येता, दिनांक २७ मार्च, १९९५ रोजी मृत महिलेला तिच्या घरी गंभीर भाजल्याच्या जखमा झाल्या होत्या, यात काहीही वाद नाही. शवविच्छेदन करणारे डॉ. नरेशचंद्र सेठिया (सा. सा. - ११) यांनी सांगितले की, तिला दोन्ही बाहू आणि पाय यावर, छाती, ओटीपोटावर, पाठीवर, डोक्यावर, मानेवर आणि चेहऱ्यावर ९३ % पर्यंत भाजल्याच्या जखमा झाल्या होत्या. तसेच, सदर भाजल्याच्या जखमा हे तिच्या मृत्यूचे संभाव्य कारण असल्याचीसुद्धा साक्ष त्यांनी दिली.

२७. अपीलकर्त्याला दोषी ठरविण्यासाठी, न्यायचौकशी न्यायालयाने प्रामुख्याने मृत व्यक्तीच्या दोन लेखी मृत्यूकालीन कथनांवर भिस्त ठेवली, एक एसईएम (स. सा. - ९) यांनी नोंदविलेले आणि दुसरे तपासी अधिकारी (स. सा. - १४ ) यांनी नोंदविलेले

आणि मृत व्यक्तीने तिच्या वडिलांना (स. सा. - २) आणि पक्षकारांमध्ये विवाह घडवून आणणारे मध्यस्थ, बालाजी (स. सा. - १२) यांना दिलेले तोंडी मृत्यूकालीन कथन, परंतु, एसईएम (स. सा. - ९) आणि तपासी अधिकारी (स. सा. - १४ ) यांनी मृत्यूकालीन कथन नोंदवताना अवलंबिलेल्या प्रक्रियेतील अनेक त्रुटी लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने त्यांवर विसंबून राहणे असुरक्षित ठरवले आणि ती बाजूला ठेवली. त्याची कारणे फार दूर नाहीत.

२८. खालील कारणांमुळे तपासी अधिकारी, उपनिरीक्षक मधुकर गिते (स. सा. - १४) यांनी नोंदवलेल्या पहिल्या मृत्यूकालीन कथनावर विसंबून राहणे उच्च न्यायालयाला अवघड आढळले :

(अ) स. सा. - १४ ने पोलिस ठाण्यामधून जे मागणीपत्र प्राप्त झाले असे सांगितले होते, त्या मागणीपत्रात इतर गोष्टींबरोबरच असे नमूद करण्यात आले होते की, दुर्दैवी घटनेच्या दिवशी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास मृत व्यक्ती तिच्या घरातील स्टोव्हवर नाश्ता तयार करताना, जळत्या स्टोव्हवर तिच्या साडीचा पदर पडल्याने तिने पेट घेतला होता, परंतु, मृत व्यक्तीला ज्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, त्या रुग्णालयाचे नाव त्यात नमूद करण्यात आले नव्हते. विशेष म्हणजे, सदर मागणीपत्राच्या आधारे, स. सा. - १४ हे मृत महिलेला भेटण्यासाठी आणि तिचा जबाब नोंदवण्यासाठी रुग्णालयात गेले होते ;

(ब) स. सा. - १४ ला वरील माहिती कोणत्या स्त्रोताकडून मिळाली होती

याबद्दल संदिग्धता होती आणि खटल्यादरम्यान सदर संदिग्धतेचा खुलासा करण्याचा कोणताही प्रयत्न करण्यात आला नव्हता ;

(क) मृत व्यक्तीचे कथन नोंदवण्यापूर्वी तिची शारीरिक व मानसिक स्थिती सिद्ध करण्यासाठी, स. सा. - १४ ने उपस्थित डॉक्टरांकडून कोणतेही प्रमाणपत्र घेतले नव्हते ;

(ड) जेव्हा मृत व्यक्तीचा जबाब नोंदवण्यात आला तेव्हा डॉक्टरही उपस्थित नव्हते;

(इ) स. सा. - १४ ने मृत्यूकालीन कथन एकांतात नोंदविले नव्हते. मृत व्यक्तीचे कथन नोंदविताना तिचे नातेवाईक उपस्थित असल्याने, त्यांच्याकडून मृत महिलेला सांगितले जाण्याची /शिकवणी मिळण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

२९. एसईएम (स. सा. - ९) ने नोंदविलेले दुसरे लेखी मृत्यूकालीन कथन फेटाळताना उच्च न्यायालयाने एकत्रितपणे विचारात घेतलेली कारणे खालीलप्रमाणे आहेत :

(अ) मृत महिलेचा जबाब नोंदवण्यापूर्वी उपस्थित डॉक्टरांनी स. सा. - ९ च्या उपस्थितीत तिची तपासणी केली नव्हती ;

(ब) स. सा. - ९ ने डॉक्टरांच्या अनुपस्थितीत मृत व्यक्तीचे कथन नोंदविले ;

(क) डॉक्टरांनी स. सा. - ९ च्या उपस्थितीत मागणीपत्रावर कोणतेही पृष्ठांकन

केले नव्हते ;

(ड) स. सा. - ९ ने स्वत: मृत व्यक्तीचे कथन नोंदविले नव्हते . त्याऐवजी त्यांनी हे काम पोलिस कॉन्स्टेबलवर सोपवले आणि त्यांनी मृताचा जबाब लेखी स्वरूपात घेतला ;

(इ) कथन लेखी स्वरूपात घेतल्यानंतर, मृत व्यक्तीची त्यावर स्वाक्षरी घेण्यापूर्वी ते मृत महिलेला वाचून दाखवण्यात आले नव्हते.

(ई) मृत व्यक्तीचे कथन प्रश्नोत्तराच्या स्वरूपात नोंदविण्यात आले नव्हते.

३०. मृत व्यक्तीची दोन लेखी मृत्युकालीन कथने पूर्णपणे खोडून काढण्यासाठी वरील कमकुवत बाबी उच्च न्यायालयाला पुरेशा आढळल्या.

३१. दोन लेखी मृत्युकालीन कथने त्रुटींनी भरलेली असल्याने अविश्वसनीय ठरल्यामुळे ती फेटाळून लावण्यासाठी उच्च न्यायालयाने नोंदविलेल्या निष्कर्षांना कोणतेही आव्हान दिले नसल्यामुळे आम्ही त्यांच्या विश्वसनीयतेबाबत चौकशी करीत नाही. ती अविश्वसनीय वाटण्यासाठी उच्च न्यायालयास ही सर्व कारणे होती असे म्हणणे पुरेसे आहे. त्याऐवजी, स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या उपस्थितीत मृत व्यक्तीने सांगितलेल्या तोंडी मृत्युकालीन कथनांचे मूल्य तपासणे योग्य वाटते.

३२. मृत मुलीचे वडील रामकृष्ण महादेव उचले (स. सा. - २) यांनी अशी साक्ष

दिली की, त्यांची मुलगी जळाल्याचा निरोप मिळाल्यामुळे त्यांनी मेयो रुग्णालयात, जेथे तिला दाखल करण्यात आले होते, तेथे धाव घेतली. मृत व्यक्तीस भाजल्याच्या जखमा झाल्या होत्या आणि तिची प्रकृती गंभीर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हा प्रकार कसा घडला, याबाबत त्यांनी तिला विचारणा केली असता, तिने सांगितले की, त्या दुर्दैवी दिवशी ती गव्हाचे धान्य साफ करत असताना अपीलकर्ता घरी आला होता, त्याने तिला मारहाण केली, तिचे हात बांधत तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला पेटवून दिले होते. स. सा. - २ ने अशी साक्ष दिली की, सन १९९४ मध्ये अपीलकर्त्याशी लग्न झाल्यानंतर त्याची मुलगी तक्रार करत होती की, पैशांच्या मागणीवरून अपीलकर्ता तिला वाईट वागणूक देत असे आणि तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे. याबाबत पारडी ग्रामीण पोलिस ठाण्यात त्यांनी फिर्याद दिल्याचे त्यांनी सांगितले. उलटतपासणीदरम्यान स. सा. - २ ने तपासादरम्यान पोलिसांनी आपला जबाब नोंदवल्याचे नाकारले होते. जरी सहाय्यक सरकारी वकिलांना वरील बाबीवर स. सा. - २ ची फेरतपासणी करण्याची परवानगी देण्यात आली होती तरी, आपल्या मुलीला जाळल्याप्रकरणी लकडगंज पोलिसांनी चौकशी केल्याचे त्यांनी सांगितल्याखेरीज या फेरतपासणीतून काहीही महत्वाचे निष्पन्न झाले नाही. विशेष म्हणजे तपासी अधिकारी, उपनिरीक्षक मधुकर गिते (स. सा. - १४) यांच्या सखोल उलटतपासणीदरम्यान त्यांनी स्पष्टपणे असे सांगितले होते की, त्यांनी स. सा. - २ चा जबाब नोंदवला होता, परंतु, अपीलकर्त्याने मृत व्यक्तीस पैशांकरिता किंवा तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण

केली होती या संदर्भात स. सा. - २ ने केलेल्या दाव्याबाबत प्रश्नांना स. सा. - १४ ला उलटतपासणीदरम्यान तोंड दयावे लागले नव्हते. प्रत्यक्षात, त्यांची पाळी आली असता, स. सा. - १४ ने स. सा. - २ चा जबाब नोंदविला नव्हता ही बाब नाकारली होती.

३३. दुसरे तोंडी मृत्यूकालीन कथन हे मृत व्यक्तीने बालाजी (स. सा. - १२ ) या मध्यस्थाला, ज्याने अपीलकर्ता आणि मृत व्यक्तीचे लग्न पार पाडण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती, त्याला केले होते. लग्नानंतर अपीलकर्त्याने मृत महिलेकडे रोख रक्कम आणि सोनसाखळीसह अनेक मागण्या केल्या होत्या आणि जर तिच्या आई-वडिलांकडून तिने पैसे आणले नाहीत तर मारहाण करू, अशी धमकी तो देत होता, अशी साक्ष जरी त्याने दिली असली, तरी उलटतपासणीदरम्यान त्याने पोलिसांसमोर तसे सांगितले नसल्याची कबुली दिली. स. सा. - १२ ने पुढे असे नमूद केले की, अपीलकर्त्याच्या अनुपस्थितीत तो स. सा. - २ सह मृत महिलेला भेटण्यासाठी तिच्या घरी गेला होता आणि त्यावेळी तिने तक्रार केली होती की, अपीलकर्ता तिला मारहाण करत होता आणि तिला तिच्या माहेरी परत नेण्याची विनंती केली होती. त्यानंतर स. सा. - १२ आणि स. सा. - २ यांनी लकडगंज पोलिस स्टेशनमध्ये अपीलकर्त्याविरोधात तक्रार दाखल केली होती. त्याने पुढे असे नमूद केले की, मृत मुलीला पंधरा दिवसांसाठी तिच्या माहेरी आणण्यात आले होते. पंधरा दिवसांनंतर ती सासरच्या घरी परतल्यानंतर स. सा. - १२ ने मृत व्यक्ती पेटल्याची आणि तिला मेयो रुग्णालयात दाखल केल्याची चिठ्ठी मिळाल्याचा दावा केला. जेव्हा तो रुग्णालयात गेला तेव्हा मृत महिलेने त्याला

सांगितले की, जेव्हा ती गहू साफ करत होती, तेव्हा अपीलकर्ता घरी आला होता आणि त्याने तिचे हात नाडीने बांधून आत नेले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने मृत व्यक्तीच्या अंगावर रॉकेल ओतून माचिसची काडी पेटवून तिला पेटवून दिले होते.

३४. स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षीचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, त्यांनी मृत व्यक्तीने त्यांना कथितरीत्या सांगितलेल्या गोष्टींच्या वेगवेगळ्या आवृत्त्या सादर केल्या आहेत. अपीलकर्त्याच्या सततच्या हुंड्याच्या मागण्या पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याने ही घटना घडल्याचे या दोघांनी सांगितले. अपीलकर्त्याचे शेजारच्या एका विधवा महिलेशी अनैतिक संबंध होते, जे मृत व्यक्ती आणि अपीलकर्ता यांच्यातील भांडणाचे सतत कारण होते आणि त्यामुळे हा प्रसंग उद्भवला असल्याचा काहीही उल्लेख नव्हता. तपासादरम्यान पोलिसांनी आपला जबाब नोंदवला नव्हता आणि खटल्यादरम्यान साक्षीदाराच्या पिंजऱ्यात प्रवेश केल्यानंतरच त्यांनी प्रथमच साक्ष दिली होती असे दोन्ही साक्षीदारांनी सांगितले, ही बाब समर्पक आहे.

३५. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलांनी उद्धृत केलेल्या **<u>अरुण भानुदास पवार</u>** (उपरोल्लेखित) या प्रकरणात, जेव्हा पीडित व्यक्तीची आई त्यास भेटण्यास रुग्णालयात आली होती, तेव्हा पीडित व्यक्ती शुद्धीवर आली होती आणि तिने इतर दोन साथीदारांसह हल्लेखोर म्हणून आरोपीचे नाव घेतले होते हे सिद्ध करण्यासाठी, पीडित व्यक्तीवर उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यासह कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराकडून केलेल्या

पुष्टीअभावी, पीडितेची आई असलेल्या हितसंबंधी साक्षीदाराची साक्ष स्वीकारण्यास या न्यायालयाने नकार दिला होता. आईची साक्ष फेटाळण्यामागे आणखी एक कारण म्हणजे फौ. प्र. सं. च्या कलम १६१ अन्वये पोलिसांनी नोंदवलेल्या जबाबात तिने तसे नमूद केले नव्हते आणि तिने प्रथमच असे विधान न्यायालयासमोर केले होते. मृत व्यक्तीने केलेले तोंडी मृत्यूकालीन कथन काळजीपूर्वक आणि सावधगिरीने विचारात घ्यायला हवे असा निर्णय देताना, कथनाच्या कर्त्याची उलटतपासणी करता येऊ शकत नसल्यामुळे, आपल्या आईला तोंडी कथन करण्यासाठी मृत व्यक्ती योग्य स्थितीत असल्याचे दर्शविण्यासारखे काहीही नसताना, मृत महिलेने तिच्या आईला, हितसंबंधी साक्षीदाराला दिलेले तोंडी मृत्यूकालीन कथन उच्च न्यायालय आणि न्यायचौकशी न्यायालय यांनी स्वीकारणे न्यायालयास चुकीचेआढळले. **पूनम बाई** (उपरोल्लेखित) या प्रकरणातही या न्यायालयाने असेच मत मांडले आणि असा निर्णय दिला की :

> "१६. जेथे तोंडी मृत्यूकालीन कथनाचा संबंध आहे, तेथे तोंडी मृत्यूकालीन कथनाशी संबंधित पुरावा हा स्वतःच एक कमकुवत प्रकारचा पुरावा आहे, याव्यतिरिक्त अभिलेखावरील पुरावे खूप डळमळीत आहेत. अभियोग पक्षाच्या प्रकरणानुसार, मृत महिलेने ललिता साहू (स. सा. - २), पिलाराम साहू (स. सा. - ३), पार्वती बाई (स. सा. ४) आणि इतरांसमोर तोंडी मृत्यूकालीन कथन केले होते जरी स.सा. २, ३ आणि ४ ने अशी साक्ष दिली आहे की, मृत

व्यक्तीने त्यांच्यासमोर अपीलकर्त्यास गुंतविणारे तोंडी मृत्यूकालीन कथन केले होते तरी, ही आवृत्ती स्पष्टपणे केवळ विचारोत्तर आहे, कारण ती न्यायचौकशी न्यायालयासमोर प्रथमच सादर केली होती. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६१ अन्वये पोलिसांनी नोंदवलेल्या त्यांच्या जबाबांमध्ये या साक्षीदारांनी मृत व्यक्तीच्या कथित तोंडी मृत्यूकालीन कथनासंदर्भात कोणतेही विधान केले नव्हते. या बाबींची दखल न्यायचौकशी न्यायालयाने आपल्या सविस्तर निकालात घेतली आहे. अशा प्रकारे, तोंडी मृत्यूकालीन कथनासंदर्भात स. सा. २, ३ आणि ४ याच्या साक्षी स्पष्टपणे सुधारित आवृत्ती आहेत आणि हे बचाव पक्षाने कायद्यानुसार सिद्ध केले आहे."

३६. आमचे मत असे आहे की, एकदा का उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाच्या मताशी असहमती दर्शविली आणि मृत्यूकालीन कथन नोंदवताना एसईएम (स. सा. - ९) आणि तपासी अधिकारी (स. सा. - १४) यांनी अवलंबलेल्या प्रक्रियेतील अनेक स्पष्ट त्रुटींमुळे मृत व्यक्तीची दोन लेखी मृत्यूकालीन कथने फेटाळून लावली, त्यानंतर स. सा. - २, मृत व्यक्तीचे वडील आणि स. सा. १२, कुटुंबाचे मित्र, जे दोघेही हितसंबंधी साक्षीदार होते आणि ज्यांचे पुरावे स. सा. - ९ आणि स. सा. - १४ द्वारे नोंदवलेल्या मृत व्यक्तीच्या कथनाच्या आवृत्तीच्या विरुद्ध आहेत, त्यांच्या तोंडी साक्षीवर अपीलकर्त्यावर

आरोप ठेवता आले नसते. हे लक्षात घेतले पाहिजे की, दोन लेखी आणि इतर दोन तोंडी अशी चारही मृत्यूकालीन कथने ही, जेव्हा मृत महिलेला ९३% भाजल्याच्या जखमा झाल्या होत्या आणि कथन करण्यासाठी ती मानसिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहे की नाही याबद्दल गंभीर शंका होती, तेव्हा तिने दिनांक २७ मार्च, १९९५ या एकाच दिवशी वेगवेगळ्या वेळी दिलेल्या जबाबांवर आधारित होती. तपासी अधिकाऱ्याने (स. सा. - १४) दुपारी ३.२० वाजता पहिले मृत्यूकालीन कथन नोंदविले होते, त्यानंतर एसईएम (स. सा. - ९) ने दुपारी ४.३० ते ५.०० च्या दरम्यान दुसरे मृत्यूकालीन कथन नोंदविले होते. त्याच दिवशी स. सा. २ आणि स. सा. - १२ यांनीदेखील रुग्णालयात मृत महिलेची भेट घेतली होती आणि असा दावा केला होता की, तिला भाजल्याच्या जखमा कशा झाल्या होत्या याची माहिती तिने त्यांना दिली होती आणि अपीलकर्त्याचे नाव आरोपी म्हणून घेतले होते.

३७. स. सा. २ आणि स. सा. -१२ या दोघांनीही अशी साक्ष दिली आहे की, मृत व्यक्तीकडे अपीलकर्त्याने केलेल्या हुंड्याच्या मागण्या आणि त्याने तिच्या चारित्र्यावर संशय घेतल्यामुळे कथित घटना घडली होती, या बाबींचा मृत व्यक्तीने आपल्या मृत्यूकालीन कथनात उल्लेख केला होता. वर नमूद केल्याप्रमाणे, त्यांच्या साक्षीत कोठेही अभियोग पक्षाच्या म्हणण्याचा उल्लेख केलेला नाही की, अपीलकर्त्याचे शेजारी राहणाऱ्या एका विधवा महिलेशी अनैतिक संबंध होते, जे दांपत्यामधील कटुतेचे मुख्य कारण होते आणि ज्याच्या परिणामी ही घटना घडली होती. या कथित घटनेला

कारणीभूत ठरणाऱ्या कारणांची पूर्णपणे वेगळी आवृत्ती स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या संपूर्ण साक्षीवर छाया टाकते, ज्यामुळे त्यावर अवलंबून राहणे आणि अपीलकर्त्यावर ठेवलेल्या आरोपासाठी त्याला दोषी ठरविणे असुरक्षित होते. त्यामुळे आमचे मत असे आहे की, स. सा. - २ आणि स. सा. - १२ यांच्या साक्षींना आधार देण्यासाठी विश्वासार्ह परिपोषक साक्षीपुरावा सादर करण्याची जबाबदारी पार पाडण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे.

३८. वर चर्चा केलेल्या पुराव्यांच्या पार्श्वभूमीवर आणि अनेक मृत्युकालीन कथनांशी संबंधित पुराव्यांचे आकलन करणाऱ्या तत्त्वांबाबत सतर्क राहून, उच्च न्यायालयाने काढलेल्या निष्कर्षांना संमती देणे आम्हाला अवघड जाते. अपीलकर्त्याला त्याच्या पत्नीच्या हत्येच्या गुन्ह्यामध्ये दोषी ठरवण्यासाठी स. सा. - २ आणि स.सा. १२ यांचे पुरावे पुरेसे भक्कम मानले जाऊ शकत नाहीत. म्हणून तो संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहे.

३९. वरील चर्चेचा परिणाम म्हणून, आक्षेपित न्यायनिर्णय फेटाळण्यात येत आहे आणि रद्दबातल ठरवण्यात येत आहे. परिणामी, अपीलकर्त्याची त्याच्यावरील आरोपातून दोषमुक्त करण्यात येत आहे आणि इतर कोणत्याही प्रकरणात आवश्यक नसल्यास, त्याला ताबडतोब मुक्त करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

## आदेश

स्वतंत्रपणे नोंदविण्यात येणाऱ्या कारणांमुळे, अपील मंजूर करण्यात येत आहे.

अतिरिक्त सत्र न्यायालय, नागपूर यांचा दिनांक २९.०४.१९९७ रोजीचा आणि उच्च न्यायालयाचा दिनांक २६.०७.२०१० रोजीचा न्यायनिर्णय आणि आदेश फेटाळण्यात येत आहे आणि रद्दबातल करण्यात येत आहे.

अपीलकर्त्यास सर्व आरोपातून दोषमुक्त करण्यात येत आहे आणि इतर कोणत्याही प्रकरणात आवश्यक नसल्यास, त्याला ताबडतोब मुक्त करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

x-x-x-x

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x